


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : ९८२२१५२९५५

बीड – महाराष्ट्र | मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक २५ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com






डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा
– संपादक

# १०० खात्यांचा गौडबंगाल ! अशोक खरात 'नॉमिनी'



## रुपाली चाकणकर कुटुंबाशी धक्कादायक कनेक्शन उघड; पथसंस्थेतील 100 पैकी 4 खाती चाकणकर कुटुंबाची

**शिर्डी । प्रतिनिधी**

भोंदू अशोक खरात याच्या काळ्या साम्राज्याचे धागेदोरे आता राजकीय वर्तुळातील नातेसंबंधांपर्यंत पोहोचले आहेत. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा चाकणकर आज शिर्डी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी हजर झाल्या आहेत. समता पतसंस्थेतील संशयास्पद कोट्यवधींच्या व्यवहाराप्रकरणी पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली होती.

### ● १०० पैकी ४ खाती चाकणकर कुटुंबाची...

अशोक खरात विरोधात शिर्डीत बेकायदेशीर सावकारी आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. तपासादरम्यान पोलिसांना 'समता पतसंस्थेत' खरातशी संबंधित अशी १०० संशयास्पद खाती आढळली आहेत. ज्यामध्ये खरात हा 'नॉमिनी' (वारसदार) आहे. धक्कादायक बाब म्हणजे, यातील ४ खाती प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलांच्या नावे असल्याची माहिती समोर आली होती. चाकणकर यांची खाती आमच्या पतसंस्थेत आहे, हे माहीत नव्हत. मात्र पोलिसांनी याबाबत विचारणा केल्यानंतर ते आमच्या लक्षात आलं. मात्र आम्ही सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुनच खाती उघडली असल्याचा खुलासा समता पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● ३३ खातेदाकांचे जबाब नोंदवले...

**शिर्डी पोलिसांनी ९ एप्रिल रोजी प्रतिभा चाकणकर यांना चौकशीची नोटीस काढत १० एप्रिल रोजी भारतीय डाक विभागाच्या रजिस्टर टपालानं त्यांच्या दोन पत्त्यांवर पाठवली होती. त्यानंतर त्या आता चौकशीसाठी हजर झाल्या आहेत. पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधित ३३ खातेदारांचे जबाब नोंदवले आहेत. मात्र, चाकणकर कुटुंबाशी संबंधित असलेल्या या खात्यांमधील मोठी रक्कम पाहता प्रतिभा चाकणकर यांचा जबाब या संपूर्ण तपासातील सर्वात महत्त्वाचा दुवा मानला जात आहे. प्रतिभा चाकणकर काय जबाब नोंदवणार? अशोक खरातविषयी काय बोलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**




# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन आर्थिक प्रगती साधावी : आ. विजयसिंह पंडित

## गेवराईत खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक व ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

पारंपारीक पिक पध्दतीमध्ये बदल करून शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत नगदी पिके, नफ्याची उत्पादने, फळबागा, भाजीपाला यांसह रेशीम शेतीसारखे अभिनव प्रयोग करून आर्थिक प्रगती साधावी, शासनाच्या पोखरासह इतर योजनांचा लाभ सामान्य शेतकऱ्यांना मिळावा यासाठी कृषी विभागाने जनजागृती करावी, खते आणि बि-बीयाणे यांचा अवैध साठा करून




चढ्या भावाने विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत गेवराई येथे खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक व ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी कृषी, महसुल व पंचायत विभागाचे अधिकारी, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत ग्राम कृषी संजीवनी कार्यशाळा सोमवार, दि.१३ एप्रिल रोजी अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात संपन्न झाली. यावेळी आ. विजयसिंह पंडित, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये एसीबीने लाचखोर पकडला!



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढलेला असल्याचे सातत्याने होणार्या एसीबीच्या कारवाईवरुन सिद्ध होत आहे. बीड शहरातील पालवण चौक परिसरात जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी (दि.१३) शासकीय निरीक्षणगृहाचा प्रभारी अधीक्षक कपिल भीमराव कांबळे याला ३० हजार रुपयांची लाच घेताना सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास रंगेहात पकडले आहे.

तक्रारदार हा सुरक्षा रक्षक असून त्याची हजेरी सुरळीतपणे वरिष्ठांकडे पाठवण्यासाठी आणि संबंधित आदेश काढण्यासाठी कपिल कांबळे याने ४५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ३० हजार रुपये देण्याचे ठरले. याप्रकरणी रविवारी तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर जालना ▶▶ उर्वरित पान २ वर




# कुठे गेली आमची लेक ?

## चौदा वर्षीय भक्तीचा पत्ता लागेना...

## बार्शीटाकळी पोलिसांचे शोधसत्र सुरू



**बीड । प्रतिनिधी**

बार्शीटाकळी (अकोला) तालुक्यातील राजंदा येथील एक १४ वर्षीय मुलगी आज पहाटेपासून बेपत्ता असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भक्ती उर्फ गौरी दत्तात्रय महल्ले (वय १४ वर्षे ७ महिने) असे या मुलीचे नाव असून, ती आज ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ५ वाजेच्या सुमारास घरातून निघून गेली आहे.

कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही, त्यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण पसरले आहे. याप्रकरणी बार्शीटाकळी पोलीस स्टेशनमध्ये माहिती देण्यात आली असून पोलीस प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे. ओळख पटवण्यासाठी महत्त्वाची माहिती– नाव: भक्ती उर्फ गौरी दत्तात्रय महल्ले, वय: १४ वर्षे ७ महिने, राहणार: राजंदा, ▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईत जमीन वादातून शेतकऱ्याची निर्घृण हत्या; एकाच कुटुंबातील तिघांवर खुनाचा गुन्हा

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गौंडगाव शिवारात किरकोळ जमीन वादातून ५७ वर्षीय शेतकऱ्याची काठ्या आणि दगडांनी मारहाण करून हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.मृत शेतकऱ्याचे नाव अर्जुन साहेबराव माळी असे असून, या प्रकरणी गेवराई पोलिसांनी एकाच कुटुंबातील तिघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता घडली. मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन माळी यांनी गौंडगाव शिवारातील गट क्रमांक १५५ मधील गायरान जमिनीचा काही भाग मशागतीसाठी वापरात घेतला होता. या जमिनीच्या शेजारी आरोपींची शेती असल्याने दोन्ही बाजूंमध्ये आधीपासून वाद होता. घटनेच्या दिवशी सायंकाळी, माळी हे शेतात गेले असता आरोपींनी त्यांना घेरले. शेताचा बांध फोडल्याच्या कारणावरून वाद वाढला आणि आरोपींनी काठ्या व दगडांनी अमानुष मारहाण केली. गंभीर जखमी अवस्थेत माळी यांना प्रथम



गेवराई येथील सरकारी रुग्णालयात आणि नंतर बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, मध्यरात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृताच्या मुलगा पपेश माळी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मधुकर नायबा शिंदे, मनोहर मधुकर शिंदे तसेच एका विधी संघर्षग्रस्ता विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३(५) आणि ३५२ अंतर्गत खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेतकरी गट व वराह पालनाचा समावेश

## पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पशुधनावर आधारित उद्योजकता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेत आता मुरघास संयंत्र वाटप योजनेत शेतकरी समूह गटाचा तसेच वराह पालन व्यवसायाचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. पशुसंवर्धन विभागाने यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयामुळे मुरघास संयंत्रांच्या माध्यमातून वैरण विकासाला चालना मिळणार



असून पशुपालकांसाठी स्थिर व परवडणारा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. विशेषतः समूह पातळीवर काम केल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण भागात उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. या निर्णयानुसार आता वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी समूह गट, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणीकृत असलेली समुदाय आधारित संसाधन केंद्रे आणि उमेद नोंदणीकृत प्रभाग संघ यांनाही या योजनेत सहभागी होता येणार आहे. यासाठी संबंधित संस्थांकडे किमान ५० सदस्य, ५ लाख रुपये भागभांडवल आणि मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण पूर्ण असणे आवश्यक ▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक क्रांतीकार्य

१४ एप्रिल हा दिवस भारतीय समाजजीवनात एक विशेष तेज घेऊन उगवतो. हा दिवस केवळ एका महामानवाचा जन्मदिन नसून, तो अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, समतेच्या ध्यासाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा स्मरणदिन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समजून घेतले तर हे प्रकर्षाने जाणवते की त्यांनी भारतीय समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर त्या विचारांना कृतीत उतरवून एक नवा सामाजिक इतिहास घडवला.

भारतीय समाजाची पारंपरिक रचना ही अत्यंत गुंतागुंतीची आणि विषमतेने ग्रासलेली होती. जातिव्यवस्थेने समाजात उंच–नीचतेची भिंत इतकी भक्कम उभी केली होती की, काही घटकांना मानवी हक्कांपासून पूर्णतः वंचित ठेवण्यात आले होते. अस्पृश्यता ही केवळ सामाजिक भेदभावाची गोष्ट नव्हती, तर ती मानवी अस्तित्वाला नाकारणारी एक क्रूर आणि अमानुष व्यवस्था होती. अशा परिस्थितीत जन्माला आलेल्या बाबासाहेबांनी या व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. बालपणापासूनच त्यांना सहन करावे लागलेले अपमान, शाळेत पाणी पिण्याची परवानगी न मिळणे, समाजातील तिरस्काराची वागणूक या सर्व अनुभवांनी त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण केला. परंतु त्यांनी या अनुभवांना दुःख म्हणून न जगता, त्यांना परिवर्तनाच्या ऊर्जेमध्ये रूपांतरित केले.

बाबासाहेबांच्या सामाजिक कार्याचा पाया म्हणजे शिक्षण होय. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही उच्च शिक्षण प्राप्त केले. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही शिक्षण घेतले आणि आपल्या ज्ञानाच्या बळावर समाजातील विषमतेला आव्हान दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून, ते व्यक्तीच्या विचारशक्तीला विकसित करणारे आणि समाजपरिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा त्यांचा संदेश हा केवळ घोषवाक्य नसून, तो सामाजिक क्रांतीचा मूलमंत्र आहे. त्यांच्या कार्याचा विचार करताना बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना ही एक महत्त्वाची घटना ठरते. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजासाठी शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्वाभिमान निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांनी लोकांना सांगितले की, आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतः उभे राहणे आवश्यक आहे. त्यासाठी संघटनशक्ती आणि ज्ञानाची जोड असणे गरजेचे आहे.

महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा त्यांच्या सामाजिक आंदोलनातील एक ऐतिहासिक टप्पा होता. हा केवळ पाण्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर तो मानवी समानतेचा आणि स्वाभिमानाचा लढा होता. या सत्याग्रहाने संपूर्ण देशाचे लक्ष अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे वेधले. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, आम्हाला पाणी नको, आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क हवा आहे. या आंदोलनामुळे वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्यास सुरुवात केली. याचप्रमाणे नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मंदिरात प्रवेश हा केवळ धार्मिक हक्क नव्हता, तर तो सामाजिक समानतेचा प्रश्न होता. बाबासाहेबांनी या आंदोलनाच्या माध्यमातून समाजाला दाखवून दिले की, धर्माच्या नावाखाली



कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारार्ह नाही.

बाबासाहेबांच्या विचारांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी अंधश्रद्धा, परंपरा आणि रूढी यांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाला विरोध केला. त्यांच्या मते, कोणतीही सामाजिक व्यवस्था ही मानवी कल्याणासाठी असावी. जर ती मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर ती बदलली पाहिजे. त्यांनी मनुस्मृतीतील विषमतावादी विचारांना विरोध करून सामाजिक क्रांतीची दिशा दिली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या काळात महिलांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात होते. त्यांना शिक्षणाचा, संपत्तीचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार नव्हता. बाबासाहेबांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मते, समाजाची प्रगती ही महिलांच्या प्रगतीवर अवलंबून असते. म्हणूनच त्यांनी महिलांना शिक्षण घेण्यास आणि स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन दिले. कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्यही उल्लेखनीय आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना अत्यंत कठीण परिस्थितीत काम करावे लागत होते. बाबासाहेबांनी कामगारांसाठी योग्य वेतन, सुरक्षित कामाची परिस्थिती आणि मर्यादित कामाचे तास यासाठी संघर्ष केला. आठ तासांचा कामाचा दिवस ही संकल्पना त्यांनी प्रभावीपणे मांडली. यामुळे कामगारांच्या जीवनमानात मोठी सुधारणा झाली. बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी राजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोलाची भूमिका बजावली. या राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळवून दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारत एक लोकशाहीवादी आणि समताधिष्ठित राष्ट्र म्हणून उभा राहिला.

धर्माच्या बाबतीत त्यांनी स्वतंत्र आणि मानवतावादी दृष्टिकोन मांडला. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून समाजाला समता, करुणा आणि बंधुतेचा संदेश दिला. त्यांच्या मते, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा आणि तो समाजात समानता निर्माण करणारा असावा. बौद्ध धर्माच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग दाखवला. बाबासाहेबांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि धैर्य यांचे प्रतीक आहे. त्यांनी प्रत्येक अडथळ्याला संधीमध्ये रूपांतरित केले आणि आपल्या ध्येयासाठी अखंड प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित घटकांना नवे आयुष्य मिळाले आणि त्यांनी स्वाभिमानाने जगण्यास सुरुवात केली. बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक सुधारणांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी भारतीय राष्ट्राच्या घडणीमध्ये मूलभूत बदल घडवून आणले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे विविधतेने नटलेल्या समाजाला एकसंध, न्याय्य आणि लोकशाहीवादी चौकट प्रदान करणे. बाबासाहेबांनी या जबाबदारीचे ओझे अत्यंत सक्षमपणे उचलले. त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले. प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क देताना त्यांनी सामाजिक आणि आर्थिक न्यायालाही तितकेच महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही केवळ राजकीय पद्धती नव्हती, तर ती सामाजिक जीवनपद्धती होती. राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची तरतूद ही त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी स्पष्ट कायदेशीर बंदी घातली. ही केवळ कायद्याची तरतूद नव्हती, तर ती शतकानुशतकांच्या अन्यायाविरुद्धची ठाम भूमिका होती. याचबरोबर त्यांनी अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था निर्माण केली, ज्यामुळे वंचित घटकांना शिक्षण आणि नोकरीत संधी मिळाली. ही व्यवस्था सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. धर्माच्या बाबतीत बाबासाहेबांनी अत्यंत स्वतंत्र आणि तर्कशुद्ध दृष्टिकोन मांडला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्म हा मानवी कल्याणासाठी असावा. जर धर्म मानवी हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर तो स्वीकारार्ह नाही. याच विचारातून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. बौद्ध धर्मात समता, करुणा आणि बंधुता या मूल्यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे त्यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारून सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू केला. बौद्ध धर्म स्वीकारणे हे केवळ धार्मिक परिवर्तन नव्हते, तर ते सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला दाखवून दिले की, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी विचारांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील वंचित घटकांना नवी ओळख आणि आत्मविश्वास मिळाला. बाबासाहेबांचे लेखनही त्यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून समाजातील विषमतेचे विश्लेषण केले आणि त्यावर उपाय सुचवले. त्यांच्या लेखनात तर्कशुद्धता, स्पष्टता आणि सामाजिक बांधिलकी दिसून येते. त्यांनी समाजाला विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. जातीय भेदभाव हा आजही समाजातील एक संवेदनशील मुद्दा आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता बंद करण्यात आली असली, तरी मानसिकतेत अजूनही बदल पूर्णपणे झालेला नाही. बाबासाहेबांनी केवळ कायदे करून थांबले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी मनोवृत्ती बदलणे आवश्यक आहे. आजच्या काळात हीच गोष्ट अधिक महत्त्वाची ठरते.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतही अजून बरेच काम करणे आवश्यक आहे. जरी महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये प्रगती केली असली, तरी त्यांना अजूनही अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. लैंगिक भेदभाव, हिंसा, आर्थिक असमानता या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. बाबासाहेबांनी महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी अधिक ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. बाबासाहेबांनी युवकांना शिक्षण आणि स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. आजच्या युवकांसमोर अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. स्पर्धेचा वाढता ताण, बेरोजगारी आणि मूल्यांचा ऱ्हास या समस्या युवकांसमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत बाबासाहेबांचा संदेश युवकांना योग्य दिशा देतो. त्यांनी दिलेला आत्मविश्वास आणि संघर्षाची प्रेरणा युवकांना सक्षम बनवते. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. बाबासाहेबांनी लोकशाहीचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना सांगितले की, लोकशाही टिकवण्यासाठी समाजात समता आणि बंधुता असणे आवश्यक आहे. आजच्या काळात लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. बाबासाहेबांचे जीवन हे एक प्रेरणादायी प्रवास आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहून समाजात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की, ज्ञान, परिश्रम आणि दृढनिश्चय यांच्या बळावर कोणतीही अडचण पार करता येते. त्यांनी दाखवलेला मार्ग हा संघर्षाचा, पण त्याचबरोबर आशेचा मार्ग आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ औपचारिक अभिवादन करून थांबू नये. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाजात समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची स्थापना करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी दिलेला संदेश हा आजही तितकाच प्रभावी आहे. आजच्या भारताला जर खऱ्या अर्थाने प्रगत, समतामूलक आणि न्याय्य राष्ट्र बनवायचे असेल, तर बाबासाहेबांचे विचार आपल्या जीवनात आणि समाजात रुजवणे आवश्यक आहे. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी, महिलांचे सक्षमीकरण आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण या सर्व बाबींच्या माध्यमातून आपण त्यांच्या स्वप्नातील भारत घडवू शकतो.

शेवटी, असे ठामपणे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नाही, तर ते वर्तमान आणि भविष्याचा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या मार्गाला उजळून टाकतो आणि आपल्याला योग्य दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी एकच संकल्प करूया. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना आपल्या जीवनात स्थान देऊन, एक न्याय्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान 9 वरून पुढे...

## १०० खात्यांचा गौडबंगाल....

काका कोयटे यांनी केला आहे. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, प्रतिभा चाकणकर यांच्या नावे २ खाती आहेत. त्यांच्या मुलांच्या नावे २ खाती आहेत. या चारही खात्यांवरून एकूण २ कोटी ४० लाख रुपयांचे मोठे व्यवहार झाले आहेत. या पैशांचा स्रोत काय आहे ? हे पैसे खरातच्या सावकारी व्यवसायाशी संबंधित आहेत का ? आणि या व्यवहारांमागे खरातचा नेमका हेतू काय होता ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी शिर्डी पोलिसांनी चाकणकर यांचा जबाब नोंदवण्यास शिर्डी पोलिसात नोंदवला जातो. आज मंत्रिमंडळाची कॅबिनेट मंडळाची बैठक होणार असून याबाबत मुख्यमंत्री अधिक माहिती देवू शकतात. मात्र जस जसा तपास पुढे जाईल तसे यातून आणखी नावे पुढे येतील असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलय. अशोक खरातशी असलेल्या संबंधांच्या आरोपावरून रुपाली चाकणकर यांनी आपल्या महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. आता त्यांच्या सख्ख्या बहिणीचीच पोलीस चौकशी सुरू झाल्याने या प्रकरणाला मोठे राजकीय वळण मिळालेय. तर अलिकडे रुपाली चाकणकर यांचे नाव बाजूला सारून त्यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांना पुढे केलं जात असून हा प्रकार रुपाली चाकणकर यांना वाचवण्याचा प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव डव्होकेट रंजना गवांदे यांनी केला आहे.

## शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा....

खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, प्रगतीशील शेतकरी कालिदास नवले, बि–बीयाणे व खते विक्रेता संघटनेचे शांतीलाल पिसाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, तहसिलदार संदिप खोमणे, गटविकास अधिकरी अनिरुध्द सानप, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात विक्रमी उत्पादन घेणाऱ्या प्रगतीशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पोखरा, महाडीबीटी व गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे मान्यवरांच्याहस्ते वितरण करण्यात आले. याप्रसंगी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, स्व.अजितदादा पवार साहेब यांनी गेवराई तालुक्यातील रेशीम शेतीची दखल घेऊन गेवराई येथे ‘रेशीम पार्क’ उभारणीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपारीक पिक पध्दतीमध्ये बदल करून रेशीम शेतीसारख्या नफ्याच्या उत्पादनांकडे वळून आपले आर्थिक हित साधले पाहिजे. खरीप पिकांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे वेळेत आणि सुलभ उपलब्ध होण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, बियाणांची आणि खतांची साठेबाजी करून चढ्या भावाने विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी. फलोत्पादन व भाजीपाला पिके शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अर्थक्रांती घडवत आहे. यासाठी बाजार समितीने पुढाकार घेऊन गेवराईत कांदा मार्केट सुरु केले असून भविष्यात मोसंबी मार्केट गेवराईत सुरु करणार असल्याचेही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ. पंडित म्हणाले की, प्रशासन आणि शेतकरी यांनी समन्वयाने शासनाच्या चांगल्या योजना राबविल्यास शेतकऱ्यांची प्रगती होईल. कृषी विभागाच्या विशेषतः पोखरा सारख्या योजनेतून सिंचन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे, तालुक्यात चाळीस गावांची पोखरा योजनेसाठी निवड झाली आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी पारदर्शक व सर्वसमावेशक कामे कृषी कर्मचाऱ्यांनी करावीत. फार्मर आयडी दुरुस्तीचा प्रश्न आपण मार्गी लावला असून पीएम किसान मधील पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले आहेत. सुमारे दोन हजार शेतकरी आजही ई–केवायसी मुळे लाभापासून वंचित आहेत. शेतकऱ्यांची ई–केवायसी पूर्ण करण्यासाठी कृषी आणि महसुल कर्मचाऱ्यांनी संयुक्त प्रयत्न करावेत असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन मंडळ कृषी अधिकारी सतिष केसभट यांनी केले. कार्यक्रमात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, प्रगतीशील शेतकरी कालिदास नवले यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गेवराई तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी माजी सभापती पांडुरंग कोळेकर, माजी उपसभापती विकास सानप, शामराव मुळे, कारखान्याचे संचालक संदिपान दातखीळ, बळीराम साबळे, अरुण चाळक आदी उपस्थित होते.

## बीडमध्ये एसीबीने...

एसीबीच्या पथकाने सोमवारी पालवण चौक परिसरात सापळा रचला. यावेळी लाचेची ३० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना कांबळे याला रंगेहात पकडून ताब्यात घेण्यात आले. दरम्यान घरझडतीसाठी बीड एसीबीचे एक पथक रवाना केले असून पुढील कारवाई सुरु आहे. सातत्याने होत असलेल्या लाचखोरीच्या कारवाईने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

## गेवराईत जमीन....

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अण्णासाहेब पवार करत आहेत. दरम्यान पोलिसांनी आरोपींच्या शोधात चक्र फिरवली असता आरोपींनी पोलिसांना थांगपत्ता लागू नये यासाठी आपले मोबाईल बंद करून ठेवले होते. दरम्यान पोलिसांना मधुकर नायबा शिंदे व मनोहर मधुकर शिंदे हे दोघे बीडच्या बार्शी नाका परिसरात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून मोठ्या शिताफीने पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या या दोन्ही आरोपींना अवघ्या सहा तासातच बेड्या ठोकल्या आहेत.

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन....

ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन यांचा समावेश आहे. आता या निर्णयानुसार वराह पालनाला चालना देण्यासाठी ‘वराह पालन गट वाटप योजना’ समाविष्ट करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ५+१ वराह गट, विमा आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा समावेश असलेला सुमारे २.०८ लाख रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सर्वसाधारण लाभार्थ्यांना ५० टक्के तर अनुसूचित जाती–जमातींना ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेत सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील भूमिहीन, अल्पभूधारक, महिला बचत गट आणि सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यात येणार असून महिलांसाठी ५० टक्के तर दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण लागू राहणार आहे. लाभार्थ्यांना पशुपालनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आले असून स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली खरेदी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. उद्योजकता विकास योजनेअंतर्गत ४ टक्के व्याज सवलत योजना ही शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन या पशुपालन व्यवसायाबरोबरच वराह पालन व्यवसायालाही लागू करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन क्षेत्रात गुंतवणूक वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

## कुठे गेली आमची...

ता. बार्शीटाकळी, जि. अकोला. विशेष खूण: घराबाहेर पडताना तिच्या पाठीवर निळ्या रंगाची स्कूल बॅग होती आणि पायात गुलाबी रंगाची चप्पल आहे. संपर्क साधावा: जर कोणालाही ही मुलगी मिळून आली किंवा दिसली, तर कृपया खालील अधिकृत क्रमांकांवर किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला त्वरित संपर्क साधावा– १. प्रवीण धुमाळ (पोलीस निरीक्षक): ९४२०२४६९६८, २. अमित सुगंधी (पोहेकॉ, राजंदा बिट अंमलदार): ८७६६५६७०५४, ३. मनीष घुगे (पोलीस कॉन्स्टेबल): ७८८७३३५३३४

◆ पान ४ वरून पुढे...

## 'रस्ता की भ्रष्टाचाराचा.....

नागरिकांचे हाल होत आहेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे संताप अधिकच तीव्र झाला आहे. ग्रामस्थांनी या प्रकरणी तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर अधिक तीव्र झाला आहे. आम्ही आता शांत बसणार नाही. जर त्वरित कारवाई झाली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. लवकरच निवेदन देऊन आंदोलनाची दिशा ठरवली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे संपूर्ण माजलगाव तालुक्यात खळबळ उडाली असून प्रशासनाची विश्वासार्हता पुन्हा एकदा प्रश्नचिन्हाखाली आली आहे. आता प्रशासन दोषींवर कारवाई करून जनतेचा विश्वास परत मिळवणार की हे प्रकरणही दडपले जाणार, म्हणून सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुस्लिम आरक्षण एल्गार....

आणि अपरिहार्य उपाय आहे. शिक्षण, रोजगार आणि शासन व्यवस्थेमध्ये न्याय्य व समतोल प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी आरक्षणाची तीव्र गरज आजच्या परिस्थितीत अधिक प्रकर्षाने जाणवते. भारतीय राज्यघटनेने सामाजिक न्याय आणि समान संधी यांची हमी दिली असून, त्या अनुषंगाने मुस्लिम समाजाच्या मागण्या पूर्णतः घटनात्मक, न्याय्य आणि समाजहिताच्या असल्याने, घटनेच्या चौकटीत त्यांना न्याय मिळाला पाहिजे. आरक्षणामुळे मुस्लिम समाज मुख्य प्रवाहात येऊन प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करू शकतो, असा विश्वास मुस्लिम समाजाला असल्याने मुस्लिम आरक्षणाबाबत सरकारने ठोस पाऊल उचलण्याची गरज आहे. सामाजिक विषमता, शिक्षणातील मागासलेपणा आणि वाढती बेरोजगारी या गंभीर समस्यांमुळे मुस्लिम समाज आज अनेक अडचणींना सामोरा जात असून, अशा कठीण परिस्थितीत आरक्षण एक प्रभावी संधी ठरू शकते, जी या समाजाच्या भविष्याला नवी दिशा देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची संधी निर्माण करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुस्लिम समाजाला दिलेल्या आरक्षणाचा उल्लेख करत, भविष्यात पक्षाला सत्ता मिळाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आरक्षणाच्या बाजूने सकारात्मक प्रतिसाद देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दिनांक १७ एप्रिल रोजी बीडमध्ये समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निघणारा आरक्षण एल्गार मोर्चा सामाजिक न्याय, समानता आणि घटनात्मक अधिकारांसाठी उभा राहिलेला मुस्लिम हिताचा लढा आहे.

या न्याय्य व कायदेशीर आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा पूर्ण पाठिंबा असून, या लढ्यात पक्ष शेवटपर्यंत खंबीरपणे सोबत राहील, अशी भूमिका राजेंद्र मस्के यांनी मांडली आहे.

## माजलगावची लेक पुन्हा...

विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत बीड जिल्ह्यातील माजलगावची ही लेक अव्वल ठरली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरत आहे. किरणच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याचा मान उंचावला असून, सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि नरवडे कुटुंबीयांनी तिच्या यशाचा अभिमान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या किरणने मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. तिच्या या कामगिरीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणास्थान ठरली आहे. किरण नरवडेच्या या घवघवीत यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भविष्यातही ती असेच यश संपादन करून माजलगावचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मुस्लिम आरक्षण एल्गार....

(जिल्हाध्यक्ष किसान सभा बीड), सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, सिताबाई भोसले ( जिल्हाध्यक्ष महिला रिपब्लिकन पार्टी बीड) आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. मुस्लिम आरक्षणाच्या प्रश्नावर सामाजिक संघटनांचा पाठिंबा वाढत असून, १७ एप्रिल रोजी होणाऱ्या मोर्चाकडे लक्ष लागले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरु : मदत आणि उपचाराला मिळणार गती

## आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# महिलांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढला पाहिजे: प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर

### बलभीम महाविद्यालयात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ बीड केंद्राच्या वतीने आयोजित समारंभात प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**



महिलांचा राजकीय प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग वाढायला हवा तसेच 'बचत गट, उज्वल भारत इत्यादी योजनांद्वारे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. विधिमंडळाबरोबरच अगदी घरांपासून-व्यवहारापर्यंत त्यांचा सहभाग वाढला पाहिजे. महिलांनी वैचारिक प्रगल्भता अंगिकारून थोर विभुतींचे साहित्य वाचले पाहिजे व आपले आदर्श व्यक्तिमत्व घडवले पाहीजे असे प्रतिपादन बीड येथील महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या आयस्कर यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, बीड केंद्राच्या वतीने दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात 'नारी शक्ती वंदन अधिनियम-२०२३ विधिमंडळ धोरण निर्मिती महिला सहभाग विशेष चिंतन' समारंभ आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे होते तर मंचावर इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ बीड केंद्राचे समन्वयक डॉ. अमोल पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# 'चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूल'च्या वतीने शासकीय नोकरदारांचा सत्कार

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



येथील चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूलच्या वतीने दिंद्रुड पंचक्रोशीतील व्यक्तींचा शासकीय नोकरीत भरती झाल्याबाबत सोमवारी सत्कार सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना नवचेतना मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दिंद्रुड पंचक्रोशीतील संगम येथील श्रीकांत होरमाळे हे वर्ग एकचे अधिकारी (बिडीओ) म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले आहेत, त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीस पदावर कृष्णा वैजनाथ तोंडे, ज्ञानेश्वरी नवनाथ सांगळे, सुमैय्या शरीफ शेख, उमेश भास्कर केकान नुकतेच भरती झाले आहेत. या पदावर जाण्यासाठी सर्वांनी घेतलेले कष्ट व अभ्यास याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ध्येयपूर्ती करण्यासाठी मोठे स्वप्न पहावे लागतात व ते पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात, परिश्रमाचे फळ निश्चितच मिळत असल्याचे उद्गार मनोगतात सर्व नूतन भरती झालेल्या मान्यवरांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अतुल ठोंबरे, प्राचार्य निलेश निंदाने, पत्रकार संतोष स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन बिबीशन बडे तर आभार शाळेचे समन्वयक राजेंद्र पांडे यांनी मानले.

# मुख्याध्यापकांचा अनोखा सत्कार; विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड'चे वाटप





### सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण व शेख वसीम यांचा स्तुत्य उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील मिल्लीया मुलांची प्राथमिक शाळा येथे नुकताच एक प्रेरणादायी उपक्रम पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक शेर खान सर यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उत्तम कार्याची दखल घेत, त्यांचा सत्कार एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आला. केवळ हार-तुरे न देता, शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड' (परीक्षा पॅड) वाटप करून हा दिवस सामाजिक संदेश देत साजरा करण्यात आला.

उपक्रमाची वैशिष्ट्ये: आयोजक:समाज सेवक मुसाखान पठाण व सामाजिक कार्यकर्ते शेख वसीम.

प्रमुख उपस्थिती: मुसाखान पठाण (प्रमुख अतिथी) आणि पत्रकार पठाण अमरजान.

उद्देश: मुख्याध्यापकांच्या कार्याचा गौरव करतानाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना मदत करणे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे लाडके 'शेर खान सर' यांचा गौरव करण्यात आला आणि त्यानंतर गरजू विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले. आगामी परीक्षांच्या काळात ही मदत मिळाल्याने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंद व्यक्त केला. शिक्षकांचा सत्कार करताना तो समाजाला आणि विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल अशा पद्धतीने व्हावा, या विचारातून हा उपक्रम राबवण्यात आला. - आयोजक


उपस्थित मान्यवर व शिक्षक: या कार्यक्रमाला शाळेतील शेख गफार सर, मोमीन अझरुद्दीन सर, शेख मुस्तमिल सर, शेख इकबाल सर, रफत मॅडम, नूजत मॅडम, नज्मुनिसा सेहर खतीब मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याध्यापकांच्या सत्काराचे औचित्य साधून राबविलेला हा समाजोपयोगी उपक्रम सध्या बीडमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे

# अपघातग्रस्त तांदुळचा ट्रक अखेर १५१ दिवसांनी सुटला पण तांदूळ खराब व वाहन मालकाचे बुडालेले उत्पन्न ची भरपाईच काय ?

### भरपाईसाठी प्रशासनाच्या विरोधात न्यायालयात जाणार: ॲड श्रीराज शेळके

**बीड । प्रतिनिधी**



५ महिन्यापूर्वी पोलीस स्टेशन बीड ग्रामीण ने जप्त केलेला ट्रक ची चौकशीचे कारण सांगून सोडण्यासाठी टाळाटाळ करत होते त्यामुळे वाहन मालक यांनी ॲड श्रीराज शेळके यांचे मार्फत अर्ज केल्यानंतर मा न्यायालयाने ट्रक तात्काळ देण्याचे आदेश केले पण ट्रक मधील तांदूळ हा नाशवंत झाल्यामुळे ट्रक मालकाने फक्त ट्रक ताब्यात घेतला व तांदूळ हा घेण्यास साफ इन्कार केला त्यामुळे नाशवंत तांदूळ बीड शासकीय गोदामात ठेवण्यात आला असून सदर सर्व तांदूळ हा नाशवंत झाल्यामुळे फार मोठे नुकसान असून फक्त बीड ग्रामीण पोलीस स्टेशन व महसूल प्रशासनामुळे झालेले असून ट्रक मालकाचे आज पर्यंत ट्रक पासून मिळणारे भाडे बुडाले असून ३० ते ३५ लाखाचे नुकसान झालेले असून त्याची मागणी ॲड श्रीराज शेळके यांचे मार्फत वाहन मालक व तांदूळ मालक न्यायालयात नुकसान भरपाईचा दावा दाखल करणार असून त्याची भरपाई पोलीस स्टेशन व महसूल च्या हलगर्जी मुळे प्रशासनाच्या माथी बसणार आहे. सदरील जप्त केलेला ट्रक मधील तांदूळ हा जप्त केल्यावर सुरक्षित ठिकाणी पोलिसांनी नं ठेवल्यामुळे तो पावसाने भिजून पूर्णपणे नाशवंत झाला आहे, त्याची भरपाई पोलीस प्रशासन किती व कधी भरून देईल हे आता मा न्यायालयच ठरवेल.


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश,**
**क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ५६६/२०२६**
**शुभांगी जयेंद्रकुमार काळे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- **१. शुभांगी जयेंद्रकुमार काळे, वय-४६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. २. स्वरुपा जयेंद्रकुमार काळे, वय-२६, वर्षे, धंदा-घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. ३. यश जयेंद्रकुमार काळे, वय-२२ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. ४. सुलोचना भ्र. सखाहरी काळे, वय-८२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड**

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचा मृत्यु दिनांक ०२.०३.२०२६ रोजी सहयोगनगर बीड, ता. जि. बीड** येथे मयत झाले असुन अर्जदार क.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी तर अर्जदार के ३ हा मयताचा मुलगा आहे अर्जदार क ४ ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९ जुन २०२६**
**(ॲड. राम ज. दहिवाळ)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व स्तर,**
**बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९७/२०२६**
**आश्राबाई येडे वि. निरंक**

ज्यापेक्षा सर्जेराव पि. सखाराम येडे, हे दिनांक १९/०९/२०२५ रोजी मौजे मोरगाव, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार- **१. आश्राबाई भ्र, सर्जेराव येडे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, २. मच्छिंद पि. सर्जेराव येडे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. राजेंद्र पि. सर्जेराव येडे, वय ४० वर्षे, धदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. जानकाबाई भ्र. पंढरीनाथ कवठेकर, वय ५८ वर्षे, धंदा, घरकाम, रा उखंडा, ता. पाटोदा, जि बीड, ५. सिताबाई भ्र. बद्री जाधव, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, ६. सुमल भ्र. श्रीहरी कादगे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा नागोबाचीवाडी, ता. घनसागवी, जि. जालना**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हकात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हकाबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक शाबीत दिसल्यास, त्याना / अर्जदाराना सदर मयल नामे सर्जेराव पि. सखाराम येडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

**प्रकरणाची पुढील तारीख २८/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(ॲड. रोटे डी. एम. यांचे मार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड- ४३११२२**

**दुरध्वनी क्र.०२४४२-२२२५८६** **ई-मेल** dsorbeed@yahoo.com

क्रमांक/आस्था-२/एस. आर. १६०/ २०२४/२६ — बीड, दिनांक- ०८/०४/२०२६

### जाहीर सुचना

प्रति,
अपीलदार: मारोती नामदेव काकडे (मयत) वारस
१) वामन मारोती काकडे — २) सुधाकर मारोती काकडे
३) भागवत मारोती काकडे (मयत) वारस — ३/१) दादासाहेब भागवत काकडे
३/२) रणजित भागवत काकडे — सर्व रा.मु. जरूड पो. शिवणी ता. जि. बीड

विरुध्द

जाबदार :
१) उपअधिक्षक भुमी अभिलेख, बीड
२) तलाठी सज्जा, जरूड
३) प्रकाश बप्पासाहेब काकडे,
४) सागरबाई बाबासाहेब काकडे,
५) गंगुबाई प्रकाश काकडे,
६) कृष्णा प्रकाश काकडे
७) पांडूरंग श्रीमंतराव काकडे,
८) दिपक श्रीमंतराव काकडे
९) सुहास श्रीमंतराव काकडे,
१०) बबीताबाई शामराव,
११) रामा नामदेव काकडे,
१२) गहीनीनाथ शामराव काकडे,
१३) नवनाथ एकनाथ काकडे,
१४) बळीराम साहेबराव काकडे,
१५) लक्ष्मण साहेबराव काकडे,
१६) केशव साहेबराव काकडे,
१७) बन्सी साहेबराव काकडे,
१८) ज्ञानेश्वर साहेबराव काकडे,
१९) बाबासाहेब बळीराम काकडे, अ.क्र. २ ते १९ रा. जरूड पो. शिवणी ता.जि. बीड
२०) शहादेव सुदाम कुटे,
२१) गोवर्धन परभत कुटे,
२२) मुकंदा गोविंदा कुटे,
२३) संजय गोविंदा कुटे,
२४) शिवाजी गोविंदा कुटे,
२५) सखाराम रामभाऊ कुटे
२६) चंद्रकांत गोविंदा कुटे,
२७) त्रिशाला अंकुशराव कुटे,
२८) राजकुमार अंकुशराव कुटे,
२९) नंदकुमार अंकुशराव कुटे
अ.क्र. २० ते २९ रा. कुटेवाडी पो. शिवणी ता.जि. बीड
३०) शेषेराव दामोधर येवले,
३१) मच्छिंद्र नामदेव जाधव
अ.क्र. ३० ते ३१ रा. बाभुळखुंटा पो. मौज ता. जि. बीड
३२) चंद्रकांत हनुमान चन्ने, रा. गुंधा (वडगांव) पो. पिंपळनेर ता.जि. बीड
३३) सुजाता सुभाष सपकाळ, रा. भक्ती कन्स्ट्रक्शन, नगर रोड, बीड ता. जि. बीड

**विषय- महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज.**

मौजे जरूड ता. जि. बीड येथील सव्हे नं. १०५ मधील पोट-हिस्सा मोजणी फाळणी बारा फेरफार क्र. ३११ अन्वये हिस्सा क्र. ४ व ५ पुरवणी सातबारा बाबत.

या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द मौजे जरूड ता. जि. बीड येथील सर्व्हे नं. १०५ मधील पोट-हिस्सा मोजणी फाळणी बारा फेरफार क्र. ३११ अन्वये हिस्सा ४ व ५ पुरवणी सातबारा बाबत अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरअर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की. वरील प्रकरणी दिनांक १२/०५/२०२६ रोजी वेळ सकाळी / दुपारी १२:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय. चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता.जि.बीड यांचे समोर सुनावणी आहे. नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

**वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

शिक्का

**स्वाक्षरीत/-**
**(कृष्णा शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी स्वच्छता मोहीम व दीपोत्सव उत्साहात



**माजलगांव । प्रतिनिधी**

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महा अभियानांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला स्वच्छता मोहीम व दीपोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छता मोहिमेने करण्यात आली. सहभागी कार्यकर्त्यांनी परिसरातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करून स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. त्यानंतर सायंकाळी दीपोत्सव साजरा करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. दिव्यांच्या प्रकाशात परिसर उजळून निघाला आणि वातावरणात उत्साहाचे व सामाजिक एकतेचे दर्शन घडले. या उपक्रमात ज्ञानेश्वर मेंडके, दीपक मुंडे माऊली सरवदे, रूपालीताई कचरे, विनायक रत्नपारखी अनंता जगताप भरत जोशी, कैलास खुरपे, रामेश्वर चव्हाण, रवि गायकवाड, किशोर विभुते विमलबाई डोंगरे, भीमराव डोंगरे, योगेश सोळंके, लखन अलझेंडे, सुनील अलझेंडे, अमोल अलझेंडे, विजय सुतार, भरत भिसे, आकाश गालफाडे, रोहित सकट आणि करण अलझेंडे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होण्यास मदत झाली असून, स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याचा उद्देश यशस्वी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

### बीड शहरात ‘जयभीम महोत्सव २०२६’ अंतर्गत जिल्हास्तरीय महापुरुष सामान्यज्ञान स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने आयोजित ‘जयभीम महोत्सव २०२६’ अंतर्गत जिल्हास्तरीय महापुरुष सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण विभागाचे उपायुक्त मा. उमेश सोनवणे उपस्थित होते. तसेच मुप्टा शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, प्रा. नारायण घोलप, प्रवीणकुमार तरकसे, मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, ॲड. राजेश शिंदे, अशोक ठोकळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांकासाठी ७,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५,००० रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ३,००० रुपये असे बक्षीस देण्यात आले. स्पर्धेचे आयोजन प्रा. शशिकांत जावळे (जिल्हा स्पर्धा समिती प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमात आयु. प्रणित सरवदे, आयु. सुमेध जोगदंड, मनोज वाघमारे, ड. राजेश शिंदे, अशोक ठोकळ, प्रवीण तरकसे, महादेव इनकर, जयेंद्र निकम, आप्पासाहेब कांबळे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा. अनिल जरे, प्रा. सुनील मोरे, प्रा. नारायण घोलप, अशोक सवासे आदींनी मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेतील विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक कार्तिकी अनाप हिने पटकावला. द्वितीय क्रमांक वैष्णवी थोरात व भार्गवी तुपे यांनी मिळवला, तर तृतीय क्रमांक स्वरा भांडेकर व यश जावळे यांनी मिळवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शशिकांत जावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बालाजी जगतकर यांनी मानले.

### ब्राईट सोशल फाउंडेशनचा मुस्लिम आरक्षण मोर्चाला जाहीर पाठिंबा



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी ही भारतीय संविधानाच्या तरतुदींशी सुसंगत व न्याय्य असल्याचे मत व्यक्त करत राईट सोशल फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी बीड येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मुस्लिम आरक्षण मोर्चास जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. संस्थेच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय संविधानातील कलम १४, १५(४), १६(४) व २१ अंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांच्या उन्नतीसाठी विशेष तरतुदी करण्याची तरतूद असून, मुस्लिम समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.तसेच कलम १९(१)(ल) नुसार शांततामय व लोकशाही मार्गाने मोर्चा काढणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून, सदर आंदोलन हे कायद्याच्या चौकटीत आयोजित करण्यात येत असल्यामुळे त्यास संस्थेचा पूर्ण पाठिंबा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुस्लिम समाजाच्या न्याय मागण्यांवर शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा संविधानिक मार्गाने पुढील कायदेशीर पावले उचलली जातील, असा इशाराही संस्थेने दिला आहे. ब्राईट सोशल फाउंडेशनने या आंदोलनास संपूर्ण व ठाम पाठिंबा दर्शविला असून, समाजातील सर्व घटकांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन ब्राईट सोशल फाउंडेशन च्या वतीने करण्यात आले आहे.

# 'रस्ता की भ्रष्टाचाराचा महामार्ग ?'

## माजलगावात ‘अनुसया कन्स्ट्रक्शन’वर निकृष्ट कामांचा स्फोट!



### डांबराऐवजी ‘डुप्लिकेट’ साहित्य ? रस्ता पूर्ण होण्याआधीच उखडला ; ग्रामस्थांचा संताप उसळला, आंदोलनाचा इशारा

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात विकासकामांच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित गैरव्यवहाराचा मोठा भंडाफोड झाला असून, सोन्नाथडी ते खरात आडगाव चौपाळा या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याचे समोर आले आहे. संबंधित काम करणाऱ्या ‘अनुसया कन्स्ट्रक्शन’वर ग्रामस्थांनी थेट आरोप करत संताप व्यक्त केला आहे. हा रस्ता नसून भ्रष्टाचाराचा महामार्गच तयार केला जातोय, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांच्या मते, रस्त्याच्या कामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले आहे. डांबराऐवजी हलक्या प्रतीचे आणि संशयास्पद मिश्रण वापरल्याने रस्ता पूर्ण होण्याआधीच उखडू लागला आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत खड्डे पडल्याने या कामाच्या गुणवत्तेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून शासनाच्या निधीची उघड लूट असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या प्रकरणात संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांची भूमिका देखील संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गुणवत्ता नियंत्रणाच्या सर्व नियमांना जाणीवपूर्वक पायदळी तुडवत ठेकेदाराला मोकळीक दिली जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय एवढ्या उघडपणे निकृष्ट काम होऊच शकत नाही, असा थेट आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवास करणारे नागरिक यावर अवलंबून आहेत. मात्र, निकृष्ट कामामुळे रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा पाठिंबा: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुस्लिम समाजाच्या न्याय्य व घटनात्मक हक्कांसाठी उभारलेल्या लढ्याला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. राष्ट्रवादी भवन येथे आ.संदीप क्षिरसागर,माजी आ. सय्यद सलीम भाई, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मुस्लिम आरक्षण कृती समितीला पाठिंब्याचे लेखी पत्र दिले आहे. यावेळी नगरसेवक




खुर्शीद आलम, शेख रोहील, शेख मुस्तफा, मसियोदिन, अफसर भाई, मामू गुत्तेदार, शेख राणीताई, शफीक काजी आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी निवेदनाद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली की, मुस्लिम समाज हा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला घटक असून त्याच्या उन्नतीसाठी आरक्षण हा केवळ पर्याय नसून एक अत्यावश्यक ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगावची लेक पुन्हा अव्वल ! किरण नरवडे सलग दुसऱ्या वर्षी महाविद्यलयात पहिली

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्याची हुशार आणि जिद्दी कन्या किरण नरवडे हिने पुन्हा एकदा यशाचा झेंडा रोवला आहे.



महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत तिने ७६.०४% गुण मिळवत आपल्या कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, किरणने सलग दुसऱ्या वर्षीही हे यश संपादन करत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. गेल्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतलेल्या किरणने यंदाही तीच परंपरा कायम ठेवली आहे. कोल्हापूर व सांगलीसारख्या शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या भागांतील ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रशासनाची बैठक म्हणजे ठेवीदारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार : प्रा. सचिन उबाळे

### बैठका सुरू मात्र चर्चा, सूचना आणि कागदोपत्री निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था आणि मल्टीस्टेट प्रकरणी लाखो ठेवीदारांचे पैसे अडकून पडले असताना, प्रशासनाकडून केवळ बैठकींचा फार्स सुरू आहे. दरवेळी नवी बैठक, नवे आश्वासन आणि प्रत्यक्षात शून्य कारवाई आहे. प्रशासनाकडून ठेवीदारांची थट्टा आहे असा आरोप ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन भैय्या उबाळे यांनी केला आहे. प्रा. उबाळे म्हणाले की जिल्हाधिकारी कार्यालयात दिवाळखोरीत निघालेल्या पतसंस्था मल्टीस्टेट प्रकरणी सोमवारी पुन्हा एकदा आढावा बैठक पार पडली. मात्र या बैठकीतही नेहमीचा फॉर्म्युला चर्चा, सूचना आणि कागदोपत्री निर्णय यापलीकडे काहीच घडले नाही. याआधी झालेल्या तीन बैठकींचाही हाच परिणाम दिसून



आला. त्यातही प्रत्यक्षात ठोस कारवाई झाली नाही. ज्ञानराधा, जिजाऊ, साईराम, राजस्थानीसह, अनेक पतसंस्था आणि मल्टीस्टेट प्रकरणांत ठेवीदारांची आयुष्यभराची कमाई अडकली आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. उबाळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत मोर्चा काढण्यात आला होता. दरम्यान मल्टीस्टेट प्रकरणी यापूर्वीही प्रशासनाने सलग तीन बैठका घेतल्या होत्या, मात्र प्रत्यक्षात ठोस कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. आजच्या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, पोलीस अधिक्षक, जिल्हानिबंधक,

**प्रा सचिन उबाळे अपघातात जखमी**

**ठेवीदारांच्या प्रश्नासाठी बीड ते मुंबई असा संघर्ष उभारणारे प्रा. सचिन उबाळे काही दिवसांपूर्वी बीडमध्ये झालेल्या अपघातात जखमी झाले आहेत. या अपघातात त्यांच्या पायाला दुखापत झाली असून, त्यांच्यावर संचेती हॉस्पिटल पुणे येथे उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.**

आवसायक, उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाईसह विविध सूचना दिल्या असल्या तरी त्या केवळ आदेशांपुरत्याच मर्यादित राहतात आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप प्रा. सचिन उबाळे यांनी केला.

## खांडे पारगाव येथे नवनाथ बाबा यांची दिव्य मिरवणूक संपन्न

### हलगी, टाळ, मृदुंगाच्या तालावर भाविक भक्ताचा ठेका



**शाळकरी मुलांना शालेय साहित्य वाटप**

**गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या मिरवणुकीसह शाळकरी मुलांना रजिस्टर, पेन, शालेय साहित्य वाटप करण्यात आले**

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांची दोन धाम यात्रा पूर्ण केल्याबद्दल व खांडे पारगाव येथे भिक्षा कार्यक्रमानिमित्त भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. खांडे पारगाव फाटा येथे गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची रथा मधून वाजवत गाजवत तसेच महिलांनी आपापल्या दारामध्ये सडा रांगोळी करत नवनाथ बाबा यांचे अवक्षण करून मिरवणूक काढण्यात आले. गावामधील लहान मुलं मुली शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनी तरुण युवक युवती महिला मंडळी व पुरुष मंडळी गावातील लहान थोरांपासून सर्व मंडळींनी खांडे पारगाव फाटा येथे जमून गुरुवर्य नवनाथ बाबा यांचे जंगी स्वागत करण्यात आले शाळकरी मुलांनी नेहरू व टाळ असा पोशाख करत व मुलींनी साडी नेसून कळस नारळ डोक्यावर घेऊन भव्य दिव्य अशी वाजवत गाजवत मिरवणूक काढण्यात आली. खांडे पारगाव येथील ग्रामस्थांनी डीजे च्या अवाजवी खर्चाला फाटा देत गावातील शाळकरी विद्यार्थ्यांना गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते शालेय साहित्य रजिस्टर सोबत इतर साहित्य वाटप करण्यात आले. गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांची भव्य दिव्य मिरवणूक झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते सर्व गावकरी व पंचक्रोशीतील नागरिकांना महाप्रसादाच्या पंगती करण्यात आल्या गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या आगमनाने संपूर्ण गाव आनंदमय झाले होते.

## मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा;

### मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजासाठी लागू असलेले ५ टक्के आरक्षण रद्द केल्याच्या निषेधार्थ येत्या १७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.



गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी सहकाऱ्यांसह जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर करून या मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला. मुस्लिम समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी आयोजित या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षणाची मागणी अत्यंत महत्त्वाची असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने या प्रश्नाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीला देखील पाठिंब्याचे पत्र देण्यात आले असून, सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनावर शेख मुबीन, शिवशक्ती–भीमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, रामधन जमाले (इंटक, बीड जिल्हाध्यक्ष), अशोक येडे (आम आदमी पार्टी, बीड जिल्हाध्यक्ष, माजी सैनिक), सादेक सय्यद ( बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), प्रा.डी. जी.तांदळे ▶▶ उर्वरित पान २ वर